# B.K. BIRLA CENTRE FOR EDUCATION

SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS
A CBSE DAY-CUM-BOYS' RESIDENTIAL SCHOOL

NABET

INDIAN PUBLIC SCHOOLS' CONFERENCE

## PRE MID TERM EXAM(2025-26)

**MARATHI**

| | |
|---|---|
| Class : X | Duration : **1** Hrs |
| Date : 05.08.2025 | Max. Marks : **25** |
| Admission No.: | Roll No.: |

---

कृतिपत्रिकेसाठी सूचना :

(1) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

### विभाग – अ (वाचन व आकलन )

**प्रश्न 1 :– (आकलन ) अपठित पद्यांश :–**

नको मंदिरे,नको मशिदी,नको चर्च वा गुरुद्वारा,
मनामनातून वाहत राहो मानवतेचा शीतल वारा ।।
धर्माहूनही श्रेष्ठ आम्हांला कर्मावरची अपार भक्ती
कष्टावरती निष्ठा आमची ऐक्यभावना ही तर शक्ती
अज्ञानाच्या अंधाराला मुळीच नाही जनात थारा।।
विज्ञानाच्या वाटेवरती चालत राहू सदैव सारे
हाती येतील प्रकाशवर्षे,गूढ चांदण्या दूरस्थ तारे
संवादाचा पूल उभारू गाडून टाकू मौन मनोरा ।।
माणूस ही तर जात आमुची,माणुसकी हा धर्म आमचा
दुसऱ्यासाठी त्याग समर्पण जोडू धागा परंपरेचा
सजीव सृष्टी विशाल इथली एकच कर्ता उभारणारा।।

**प्र 1 (अ) खालील प्रश्नांचे योग्य पर्याय लिहा:–** **2X1=2**

1 वरील कवितेतून आपल्याला कोणता संदेश देण्यात आला आहे?
- **अ** मानवी जीवन
- **ब** मानवाची जीवनशैली
- **क** धर्म आणि पंथ
- **ड** सर्वधर्मसमभाव,ऐक्यभावना,सर्वजण एकच आहेत

2 विज्ञानाच्या वाटेवरून चालत राहिल्यावर काय होईल?
- **अ** माणुसकीचा धर्म निर्माण होईल
- **ब** संशोधन होईल
- **क** हाती येतील प्रकाशवर्षे,प्रगती होईल
- **ड** एकमेकाबद्दल आपुलकी निर्माण होईल

**प्र 1 (ब) एका वाक्यात उत्तरे लिहा :–** **3X1=3**

1 वरील कवितेत कोणता धर्म व जात सांगितली आहे?
2 मनामनातून काय वाहत राहावे असे कवी म्हणतात?
3 धर्मापेक्षा काय श्रेष्ठ आहे असे कवी म्हणतात?

## खंड (ख) व्याकरण

**प्र 2 :– अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखाः–** **3X1=3**

**1** रामरावाचे कुटुंब खूप गरीब आहे.

**2** मी लहाणपणी क्रिकेट खेळायचो.

**3** लेखकाची परिस्थिती वाईट आणि प्रतिकूल होती.

**प्र 3 पुढील शब्दांचे लिंग बदला :–** **2X1=2**

1 पाहुणा    2 बांगडीवाला

**प्र 4 समानार्थी शब्द लिहा :–** **2X1=2**

1 चंद्र    2 दुनिया

**प्र 5 विरूध्दार्थी शब्द लिहा :–** **2X1=2**

1 दारिद्रय ×    2 रोगी ×

## खंड (ग) साहित्य

**प्र 6 स्वगत :–** **2X3=6**

**1** दोन दिवस वाट पाहण्यात गेले,दोन दुःखात गेले या ओळीतील तुम्हांला समजलेला अर्थ लिहाः–.

**2** तपोवनात आयोजित केलेल्या सत्कार समारंभाविषयी माहिती आपल्या शब्दांत लिहाः–

## खंड (घ) लेखन

**प्र 7 पत्र लेखनः–** **1X5=5**

शाळेच्या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी झाडे मागवणारे पत्र निसर्ग रोपवाटिका ,तळेगावला लिहाः–

. **:::::::::::::::::::::::: समाप्त ::::::::::::::::::::::::::::**

.